# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

**क्रमांक** :- 2/एनजीसी/अधिसूचना/2013/ 238
दिनांक : 13.02.2013

## अधिसूचना

या संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविकोत्तर / पदव्युत्तर पदविका या व्यावसायिक अभ्यासक्रमासंदर्भात प्रवेश क्षमतेतील वाढ - घट, नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, अभ्यासक्रम बंद करणे, पीआयओ / एनआरआय च्या जागा, डयुअल इंटीग्रेटेड प्रोगाम व परदेशी संस्था तथा विद्यापीठ सहयोग या साठीअखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडे केलेल्या अर्जावर शासनाचे अभिप्राय / शिफारस परिषदेस सादर करण्याच्या अनुषंगाने www.dte.org.in/courseapproval2013 या लिंक वर ऑन लाईन द्वारे माहिती भरण्यासाठी दि. 10 फेब्रुवारी 2013 पर्यंत अंतिम मुदत देण्यात आलेली होती. त्यानुसार संचालनालयाच्या संकेतस्थळी उपलब्ध झालेल्या अर्जांची तपासणी करुन त्यावर शासनाचे अभिप्राय परिषदेस विहित कालमर्यादेत सादर करण्यासाठी संबंधित संस्थाच्या दि. 27/12/2012, दि. 08/01/2013, दि. 15/01/2013, दि. 17/01/2013, 29/01/2013, 11/02/2013 व 12/02/2013 रोजी सुनावण्या झालेल्या आहेत. मात्र सदर सुनावण्यामध्ये काही संस्थाच्या सुनावण्या काही कागदपत्रामुळे प्रलंबित ठेवण्यात आलेल्या आहेत. तसेच काही संस्थानी त्यांच्या प्रवेशक्षमतेतील बदलाबाबतची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळी भरलेली असून सदर संस्था उपरोक्त सुनावणीस उपस्थित राहिलेल्या नाहीत.

म्हणून ज्या संस्थाच्या सुनावण्या झालेलया नाहीत अशा संस्थांची दि. 16.02.2013 रोजी या संचालनायात सकाळी 11.00 वाजता अंतिम सुनावणी घेण्यात येणार असून संबंधित संस्थानी सुनावणीस उपस्थित राहतांना परिषदेस सादर केलेला प्रस्ताव व खालील कागदपत्रांचा एक स्वतंत्र संच सादर करावा. तसेच सदर दिनांकानंतर कोणतीही सुनावणी घेण्यात येणार नाही याची संबंधित संस्थांनी नोंद घेण्यात यावी.

1. विहित नोंदणी शुल्क भरल्याची पावती
2. प्राचार्य / संचालक नियुक्तीस संबंधित विद्यापीठाच्या मान्यता / शैक्षणिक अर्हतची कागदपत्रे
3. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचा अद्ययावत [latest] डेफिसिअन्सी रिपोर्ट (प्राचार्यांनी प्रमाणित केलेला)
4. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचा परिषदेस सादर केलेला (पार्ट - I व पार्ट - II ) अर्ज
5. संस्था प्रमुखांनी प्रमाणित केलेले दोन प्रतीत ॲनेक्चर - सी व डी (प्रपत्र).
6. सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित केलेल्या जागा / बांधकाम / इमारतीचे नकाशे, ऑक्युपेन्सी प्रमाणपत्र इ.
7. अभ्यासक्रम बंद करणे किंवा प्रवेश क्षमता कमी करण्यासाठी अर्ज असल्यास संस्थेचा ठराव, संबंधित विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्र व कर्मचारी / विद्यार्थ्यी यांचे समावेशन तसेच याबाबत उद्भवणा-या कायदेशीर बाबीस संस्था जबाबदार राहील या आशयाचे नोंदणीकृत हमीपत्र

(दयानंद मेश्राम)
प्र.संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

---

महत्वाचे

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
क्रमांक : तंशिसं/प्राकाना/शैवि /२०१३/ 452
दिनांक 15 FEB 2013

प्रति
प्राचार्य
सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था / पदविकोत्तर / पदव्युत्तर पदविका संस्था
यांना कळविण्यात येते की, पत्रात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर.